पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाला 'टाईम्स हायर एज्युकेशन इम्पॅक्ट रँकिंग'

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाला 'टाईम्स हायर एज्युकेशन इम्पॅक्ट रँकिंग-२०२५' अंतर्गत प्रथमच आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानांकन प्राप्त झाले आहे. वर्षापासून शिवाजी विद्यापीठाने शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये विशेषतः गुणवत्तापूर्ण शिक्षण, लैंगिक समानता, स्वच्छ पाणी व स्वच्छता आणि उद्दिष्टांसाठी भागीदारी या चार बाबींकडे विशेष लक्ष केंद्रित करून सहभाग नोंदवला आहे. या क्रमवारीत स्वच्छ पाणी व स्वच्छता या शाश्वत विकास उद्दिष्टांतर्गत विद्यापीठास जागतिक स्तरावर ६०१-८०० या मानांकन पट्ट्यात स्थान प्राप्त झाले असून, ४०.६ इतका स्कोअर मिळाला आहे.

लैंगिक समानता उद्दिष्टांमध्ये विद्यापीठ १००१-१५०० या रँक बँडमध्ये असून, त्यामध्ये २२.५ इतका स्कोअर मिळाला. उर्वरित गुणवत्तापूर्ण शिक्षण व उद्दिष्टांसाठी भागीदारी या दोन उद्दिष्टांतर्गत विद्यापीठास १५०१ प्लस रँकमध्ये स्थान प्राप्त झाले आहे. टाईम्स रँकिंगमध्ये दखल घेतली जाणे ही शिवाजी विद्यापीठाची महत्त्वपूर्ण उपलब्धी असून, सर्वच घटकांसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. या यशामध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, तसेच विद्यापीठाच्या सर्व अधिकार मंडळांचे आणि सर्व घटकांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे.



## शाश्वत विकास उद्दिष्टे मानवतेसाठी आवश्यक

शिवाजी विद्यापीठाने शाश्वत विकास उद्दिष्टांकडे लक्ष केंद्रित केल्याने टाईम्सच्या प्रतिष्ठित क्रमवारीत स्थान प्राप्त झाले आहे. शाश्वस विकास उद्दिष्टे ही अखिल मानवी समुदायाच्या अस्तित्वासाठी आणि भल्यासाठी आवश्यक आहेत. त्यांच्या पूर्तीसाठी शिवाजी विद्यापीठ भविष्यातही जोमाने कार्यरत राहील, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी या निमित्ताने दिली.

0 7 AUG 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वयंअध्ययन साहित्य लेखनाची परंपरा सर्वोत्तम

## डॉ. डी. टी. शिर्के; विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रातर्फे राज्यशास्त्र अभ्यासक्रमाच्या साहित्याचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधांमधील स्वयंअध्ययन साहित्य लेखनाची परंपरा सर्वोत्तम असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विषयाच्या बी.ए. भाग-दोनच्या स्वयंअध्ययन साहित्याचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, शिक्षक, लेखक आदी.

दूरशिक्षण केंद्राने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सुधारित झालेल्या अभ्यासक्रमांप्रमाणे बी.ए.-भाग दोन राज्यशास्त्र स्वयंअध्ययन साहित्याचे प्रकाशन व्यवस्थापन परिषद सभागृहात मंगळवारी झाले. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "विद्यार्थ्यांना वेळेत स्वयंअध्ययन साहित्य देण्याने दूरशिक्षण हे नजीकचे शिक्षण होत आहे. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राने तयार केलेले स्वयंअध्ययन साहित्य सर्वच विद्यार्थ्यांना उपयोगी ठरणारे आहे. हे स्वयंअध्ययन साहित्य इतर विद्यापीठे स्वीकारत असल्याने महाराष्ट्रभर चालले आहे. त्याचा फायदा राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना होत आहे."

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मानवशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, राज्यशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. रवींद्र भणगे, डॉ. सेलुकर यांनी मनोगते व्यक्त केली. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. ज्योती जाधव, 'दूरशिक्षण'चे समन्वयक डॉ. चांगदेव बंडगर, डॉ. सचिन भोसले, योगेश पवार, विकास पाटील उपस्थित होते. 'दूरशिक्षण'चे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी प्रास्ताविक केले. उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे यांनी आभार मानले.

### ■ या विषयांचे स्वयंअध्ययन साहित्य

प्रकाशित स्वयंअध्ययन साहित्यामध्ये बी.ए. भाग-२ च्या सत्र ३ व ४ साठीच्या 'भारतीय राजकीय विचारवंत' (संपादक डॉ. शार्दुल शेलुकर, डॉ. विजय देठे), 'महाराष्ट्र शासन व महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया' (संपादक अनिल मोहिते, डॉ. संतोष खडसे), 'निवडणूक व्यवस्थापन व माध्यमे आणि राजकारण' (संपादक डॉ. राहुल मांडणीकर, डॉ. रवींद्र भणगे) आणि 'भारतीय लोकशाहीचा इतिहास' (संपादक डॉ. रवींद्र भणगे) यांचा समावेश आहे.

तरुण भारत



कोल्हापूर : भूगोल अधिविभागाच्या विस्तार इमारतीचे उद्घाटन करताना विद्यार्थिनी. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. सुहासिनी पाटील आदी.

# भूगोलच्या इमारतीचे विद्यार्थिनींच्या हस्ते उद्घाटन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागाच्या विस्तार इमारतीचे उद्घाटन विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

भूगोल अधिविभागातील जिओइन्फॉर्मेटिक्स अभ्यासक्रमांसाठी जागेची आवश्यकता लक्षात घेऊन नूतन विस्तार इमारतीचे काम केले. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी जिओइन्फॉर्मेटिक्सच्या विद्यार्थीनी सायली यादव, निकिता जाधव यांना बोलावून त्यांच्या हस्ते केले. त्यानंतर कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी इमारतीमध्ये प्रवेश केला.

यावेळी सिव्हील कंत्राटदार उदय घोरपडे, अनिरुद्ध घोरपडे आणि विद्युत ठेकेदार श्रीकांत गुजर यांचा कुलगुरूंच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. उपरोक्त दोन्ही अभ्यासक्रमांना मिळून ७० विद्यार्थी प्रवेशित आहेत. या इमारतीमध्ये वर्गखोल्यांबरोबरच थ्री-डी व्हिज्युअलायझेशन, ड्रोन टेक्नॉलॉजी यांसह जिओइन्फॉर्मेटिक्सशी निगडित प्रयोगशाळाही असणार आहेत.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, डॉ. गिरीष कुलकर्णी, उपकुलसचिव रणजीत यादव, भूगोल अधिविभाग प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. धनश्री शिंदे, डॉ. पोतदार, डॉ. विद्या चौगुले, डॉ. पाटील, अमित कांबळे, आदी उपस्थित होते.

लोकसत्ता

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd : 1962
"A++" Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

## प्रवेश सूचना
## पीएच.डी. प्रवेश २०२५-२६

शिवाजी विद्यापीठामार्फत पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेकरिता पात्र विद्यार्थ्यांकडून Online अर्ज मागणी करण्यात येत आहेत. याकरिता विद्यापीठ संकेतस्थळ www.unishivaji.ac.in अंतर्गत **Ph.D. Admission 2025-26** लिंकवर भेट द्यावी. **Link:-https://sukapps.unishivaji.ac.in/phd-entrance/#/login**

**महत्त्वाचे दिनांक :**

1. ऑनलाईन अर्ज संकेतस्थळावर दि. ०७/०८/२०२५ दुपारी १२.०० पासून उपलब्ध.
2. अर्ज करण्याचा अंतिम दि. २५/०८/२०२५ मध्यरात्री १२.०० पर्यंत.

(प्रवेश परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक तसेच हॉल तिकीट विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दरम्यानच्या काळात उपलब्ध करण्यात येईल.)

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : ०७/०८/२०२५

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
कुलसचिव

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd : 1962
"A++" Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

## प्रवेश सूचना
## पीएच.डी. प्रवेश २०२५-२६

शिवाजी विद्यापीठामार्फत पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेकरिता पात्र विद्यार्थ्यांकडून Online अर्ज मागणी करण्यात येत आहेत. याकरिता विद्यापीठ संकेतस्थळ www.unishivaji.ac.in अंतर्गत **Ph.D. Admission 2025-26** लिंकवर भेट द्यावी. **Link:-https://sukapps.unishivaji.ac.in/phd-entrance/#/login**

**महत्त्वाचे दिनांक :**

1. ऑनलाईन अर्ज संकेतस्थळावर दि. ०७/०८/२०२५ दुपारी १२. ०० पासून उपलब्ध.
2. अर्ज करण्याचा अंतिम दि. २५/०८/२०२५ मध्यरात्री १२.०० पर्यंत.

(प्रवेश परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक तसेच हॉल तिकीट विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दरम्यानच्या काळात उपलब्ध करण्यात येईल.)

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : ०७/०८/२०२५

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
कुलसचिव

लोकमत

Estd : 1962
"A++" Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प्रवेश सूचना
## पीएच.डी. प्रवेश २०२५-२६

शिवाजी विद्यापीठामार्फत पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेकरिता पात्र विद्यार्थ्यांकडून Online अर्ज मागणी करण्यात येत आहेत. याकरिता विद्यापीठ संकेतस्थळ www.unishivaji.ac.in अंतर्गत **Ph.D. Admission 2025-26** लिंकवर भेट द्यावी. **Link:-https://sukapps.unishivaji.ac.in/phd-entrance/#/login**

**महत्त्वाचे दिनांक :**

1. **ऑनलाईन अर्ज संकेतस्थळावर दि. ०७/०८/२०२५ दुपारी १२.०० पासून उपलब्ध.**
2. **अर्ज करण्याचा अंतिम दि. २५/०८/२०२५ मध्यरात्री १२.०० पर्यंत.**

**(प्रवेश परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक तसेच हॉल तिकीट विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दरम्यानच्या काळात उपलब्ध करण्यात येईल.)**

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : ०७/०८/२०२५

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
कुलसचिव

The Indian Express

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

Estd : 1962
"A++" Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

## Admission Notification
## Ph.D. Admission 2025-26

Online applications are invited from eligible candidates for admission to Ph.D. Programme. For more details the candidate may visit University website **www.unishivaji.ac.in** under **"Ph.D. Admission 2025-26"**

**Link:- https://sukapps.unishivaji.ac.in/phd-entrance/#/login**

**Important Dates :**

- **Online Application available from: 07/08/2025 from 12.00 noon onwards.**
- **Closing date: 25/08/2025 till 12.00 midnight.**

**(Detailed Time Table and Hall Ticket downloading will be available on University website in due course of time.)**

**Place : Kolhapur.**
Date : 07/08/2025

**Dr. V. N. Shinde**
**Registrar**